अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम निर्मुलन कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक क्र. अति म३५(ज)/ई/४४२७
दिनांक : १४/३/१८.

पुणे शहरातील पथ विक्रेता अधिनियम २०१४ या कायद्याअंतर्गत नोंदणीकृत फेरीवाल्यांचे योग्य ठिकाणी पुनर्वसन करणे, त्यांचेकडून मान्य दैनंदिन शुल्क आकारणे, तसेच शहरातील ''हॉकर्स झोन'' घोषित करणेबाबत याकामी मा. महापौर, पुणे म.न.पा. तथा अध्यक्ष ॲपिलेट कमिटी यांचे नियंत्रणाखाली दि. २८/२/२०१८ रोजी त्यांचे दालनात बैठक घेण्यात आली.

सदर बैठकीस खालीप्रमाणे अधिकारी उपस्थित होते.

१. मा. सौ. मुक्ता टिळक, महापौर, पुणे महानगरपालिका
२. डॉ. सिध्दार्थ धेंडे, उप महापौर, पुणे महानगरपालिका
३. मा. श्रीनाथ भिमाले, सभागृह नेता
४. मा. दीपकभाऊ मानकर, सभासद, पुणे महानगरपालिका
५. मा. सौ. अश्विनी लांडगे, गटनेत्या ए.आय.एम.आय.एम.
६. मा. साईनाथ बाबर, सभासद, पुणे महानगरपालिका
७. मा. शीतल तेली-उगले, अति. महा. आयुक्त (ज)
८. मा. माधव जगताप, उप आयुक्त (अतिक्रमण)
९. मा. मंजुषा इधाटे, विधी सल्लागार, पुणे महानगरपालिका

सर्वप्रथम मागिल सभेचा वृतांत कायम करण्यात आला व खालीलप्रमाणे चर्चा करण्यात आली.

| अ. क्र. | उपस्थित केलेला मुद्दा | बैठकीत झालेली चर्चा | घेतलेला निर्णय |
|---|---|---|---|
| १) | पुणे शहरातील नोंदणीकृत फेरीवाल्यांकरीता ठरवून देण्यात आलेल्या व्यवसायांपैकी ज्या व्यवसायांमध्ये दैनंदिन कमी उत्पन्न मिळते, असा व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यांना सध्याचे प्रचलित मान्य धोरणांतर्गत ठरवून देण्यात आलेल्या मान्य दैनंदिन परवाना शुल्कामध्ये/मागील थकबाकीमध्ये सवलत देणेबाबत निर्णय घेणे. | दैनंदिन शुल्क १ एप्रिल २०१६ पासूनची थकबाकी आकारणी करिता मा. ॲपिलेट कमिटीने दि. २९/११/२०१७ च्या बैठकीत मान्यता दिली आहे. व्यवसायिकांना थकबाकी भरण्यासाठी ४ टप्पे करुन दिलेले आहेत. सन २०१६ पासून थकबाकीची वसुल करणेत येत आहे. एप्रिल २०१६ पासून ६५०० अधिकृत फेरीवाले व्यवसायिकांचे पुनर्वसन करण्यात आलेले आहे. तसेच ४००० फेरीवाले व्यवसायिकांचे पुर्नवसन होऊ शकते. अंदाजे १०,००० हॉकर्सपासून २६ कोटी एवढे उत्पन्न पुणे महानगरपालिकेस मिळू शकते. परंतू अनेक पथारी व्यवसाय संघटनांनी कमी उत्पन्न धारकांचे व्यवसायास परवाना शुल्क कमी करणेबाबत तसेच दोन वर्षाच्या मागिल | १)परवाना शुल्क थकबाकी वसुली दि. १/४/२०१६ पासून न करता १ एप्रिल २०१७ पासून करावी. मागील थकबाकी परवाना शुल्क दोन टप्प्यामध्ये घेण्यात यावेत. २) परवाना शुल्क कमी करणेसंदर्भात सदरची सवलत फक्त अ++, अ+ व अ श्रेणीच्या व्यवसाय जागांनाच सोबत जोडलेल्या यादीमधील कमी उत्पन्न असलेल्या व्यवसायांनाच देय होईल. अ++, अ+ व अ वर्गातील व्यवसाय जागा व्यतिरिक्त इतर जागांचे शुल्क |

Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| | | थकबाकीच्या वसुलीस विरोध दर्शविणारी निवेदने प्राप्त झालेली आहेत. त्यानुसार प्रशासनाने कमी उत्पन्न असलेल्या व्यवसायधारकांचे परवाना शुल्क ५०% कमी करणेबाबतचा प्रस्ताव ठेवला असून यापूर्वीच्या परवाना शुल्क श्रेणी अ+ व अ या श्रेणीमधील अशा व्यवसायिकांना सवलतीचे शुल्क मान्य करावे, असे मा. उप आयुक्त (अतिक्रमण) यांनी समितीला माहिती देऊन सुचविले. त्यावर मा. उप महापौर यांनी चालू आर्थिक वर्षाच्या म्हणजे १ एप्रिल २०१७ पासून मागिल थकबाकी परवाना शुल्क दोन हप्त्यामध्ये घेण्यात यावेत, अशी विनंती केली. काही व्यवसाय हे कमी नफा मिळणारे असतात काही जास्त नफा देणारे असतात. उदा होजिअरी मध्ये जास्त नफा मिळतो तर किरकोळ व्रिकी करणारे नाडी-दोरा तसेच भाजीपाला विक्री, फळ विक्रेते यांची विक्री ही कमी प्रमाणात असते. यासाठी काही पथारी संघटनाशी चर्चा करुन ५०% सवलत देण्यास पात्र असलेले व्यवसाय व ५०% सवलत देण्यास अपात्र असलेले व्यवसाय अशी यादी तयार करण्यात आलेली आहे. ती यादी व शुल्क आकारणीबाबत काही निर्णय /शुल्क वसुलीबाबतची यादी मा. उप आयुक्त अतिक्रमण यांनी वाचून दाखविली. या यादीस त्यामधील नमुद अटींसह सर्व सदस्यांनी संमती दर्शविली. | पुर्वीप्रमाणेच कायम राहील. तसेच पुढील ३-३ महिन्याचे आगाऊ शुल्क घेण्यात येऊन त्यानुसार प्रशासनाने आवश्यक ती कार्यवाही करावी. अशी सवलत घेणाऱ्या व्यवसायधारकां-कडून त्यांना कोणतेही इतर उत्पन्नाचे स्त्रोत नसल्याचे हमीपत्र घेण्यात यावे, असे सर्वानुमते ठरले. |
| २) | केंद्र सरकारच्या पथ विक्रेता अधिनियम-२०१४ चे मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासनाने प्रसिध्द केलेली पथविक्रेता योजना २०१७ चे मधील कलम ४.१ मधील ५ मधील तरतुदीनुसार शहरातील नोंदणीकृत दिव्यांग फेरीवाल्या व्यवसायिकांना मान्य | जे दिव्यांग नोंदणीकृत व्यवसायिक आहेत त्यांना जो काही दैनंदिन परवाना शुल्काचा दर व्यवसाय जागेनुसार निश्चित केलेला असेल त्यामध्ये ५०% सवलत ही शासनाकडून देण्यात आलेली आहे. अशी सवलत सर्व नोंदणीकृत दिव्यांग व्यवसायिकांना मागील थकबाकीसह लागू असलेल्या परवाना शुल्कास मान्य करणेबाबत मा. उप आयुक्त (अतिक्रमण) यांनी सुचविले. यास सर्व सदस्यांनी | महाराष्ट्र शासनाच्या योजनेनुसार नोंदणीकृत दिव्यांग व्यवसायिकांना त्यांचे दैनंदिन व्यवसाय जागेनुसारच्या परवाना शुल्कामध्ये ५०% सवलत देण्याची प्रशासनाने कार्यवाही करावी. (सिव्हील सर्जनचे दिव्यांग प्रमाणपत्र बंधनकारक व दिव्यांग ४०% |

Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| | करण्यात आलेल्या व्यवसाय जागेकरिता ठरविण्यात आलेल्या दैनंदिन परवाना शुल्कामध्ये ५०% सवलत देणे अगर कसे? याबाबत निर्णय घेणे. | एकमताने मान्यता दिली.<br>अ++ या शुल्क श्रेणीतील व्यवसायिकांचे दर प्रति दिन ४००/- हे जास्त असल्याने ते कमी करावेत असे मा. सभागृह नेते यांनी सुचविले, यावर सर्वानुमते चर्चा करुन अ++ या विशेष व्यवसाय श्रेणीतील जागेस आकारण्यात येणारे परवाना शुल्क पुर्वीच्या ४०० रु. दैनंदिन शुल्काऐवजी नव्याने बंदीस्त स्टॉलधारकांना रु. ३०० प्रति दिन तसेच याच ठिकाणावर हॅंगिंग मध्ये अथवा बैठा/हातगाडी इ. मधून व्यवसाय करणाऱ्यास रु. १५०/- प्रति दिन शुल्क आकारणीबाबत सर्वांनी चर्चाअंती सहमती दर्शविली. | पेक्षा जास्त दिव्यांगत्व असलेला असावा) तसेच अ++ या विशेष व्यवसाय श्रेणीतील जागेस आकारण्यात येणारे परवाना शुल्क पुर्वीच्या ४००रु. दैनंदिन शुल्काऐवजी नव्याने बंदीस्त स्टॉलधारकांना रु. ३०० प्रति दिन तसेच याच ठिकाणावर हॅंगिंग मध्ये अथवा बैठा/हातगाडी इ. मधून व्यवसाय करणाऱ्यास रु. १५०/- प्रति दिन शुल्क आकारणी करावी, असे सर्वानुमते ठरले. |
| ३) | पुणे शहरातील नोंदणीकृत फेरीवाला व्यवसायिकांकरिता त्यांचे वापरातील व्यवसाय साधनांनुसार करावयाच्या व्यवसायाच्या अधिकृत यादीस चर्चा करुन मान्यता देणेस. (सोबत प्रशासनाने तयार केलेला अधिकृत करणेकरीता व्यवसायांच्या यादीचा तक्ता) | पुणे शहरातील नोंदणीकृत व्यवसायधारकांना त्यांचे व्यवसाय साधनानुसार करावयाच्या अधिकृत व्यवसायांच्या यादीस सर्व सदस्यांनी मान्यता दिली. तसेच या व्यवसाय यादीमध्ये काही बदल करावयाचे असल्यास त्याचा अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना राहिल असे सुचविले.<br>तद्नंतर मा. उप आयुक्त (अतिक्रमण) यांनी महाराष्ट्र शासनाच्या योजनेमधील तरतुदीनुसार दिव्यांग, एकलमाता किंवा विधवा इ. महिला व्यवसायिकांना परवाना देताना प्राधान्य देणेबाबत तरतूद असल्याने त्यानुसार कार्यवाही करणेबाबत समितीची मान्यता असावी असे सुचविले. तसेच जाहिर प्रकटनानंतर ज्या व्यवसायिकांचे बायोमेट्रीक सर्वेक्षणाकरीता अर्ज केले आहेत, अशा पात्र/योग्य व्यवसायिकांचे प्रशासनाकडून बायोमेट्रीक सर्वेक्षण करणेस समितीची परवानगी देणेस विनंती केली. वरील दोन्ही सूचनांना समिती सदस्यांनी चर्चेअंती मान्यता दिली. | प्रशासनाने सूचविलेल्या व्यवसाय यादीस अधिकृत व्यवसाय यादी करणेस मान्यता दिली. यादीमधील व्यवसाय बदलाबाबत पुढील अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना राहतील. एका कुटूंबामध्ये एकच परवाना देण्यात यावा. नोंदणीकृत व्यवसायिक हा १८ वर्षावरीलच असावा, याबाबतही प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी तसेच शासकीय दूध केंद्राबाबत शासनाचा निर्णय येईपर्यंत सध्या जुन्या धोरणाप्रमाणेच स्टॉल आकाराबाबत कार्यवाही करावी. |
| ४) | मे. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार शहरांमधील रेल्वे स्टेशन, | पुणे स्टेशनसारखा परिसर, हॉस्पिटल, बसस्थानके येथील व्यवसायिकांचे पुनर्वसन करावयाचे ठरल्यास त्यांना पर्यायी जागा | शहरांमधील रेल्वे स्टेशन, भाज्या मंडया तसेच शैक्षणिक संस्था, हॉस्पिटल, |

Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| | भाजी मंडया यांचेपासून १५० मी. तसेच शैक्षणिक संस्था, हॉस्पिटल, शासकीय कार्यालये, बसस्थानके इ. पासून १०० मी. अंतरावर फेरीवाल्यांचे पुनर्वसन न करणेबाबत दिलेल्या आदेशाची प्रत्यक्ष अमंलबजावणी करताना येणाऱ्या अडचणींबाबत निर्णय घेणे. | उपलब्ध नाही. | शासकीय कार्यालये, बसस्थानके या ठिकाणी असणाऱ्या फेरीवाल्यांचे पुनर्वसन हे त्यांना पर्यायी जागा उपलब्ध होईपर्यंत आहे त्याच ठिकाणीच ठेवावीत. फक्त शाळा, शैक्षणिक संस्था लगत असणाऱ्या पानटप-या तातडीने हलविण्यात याव्यात. इन्ट्री गेट व आऊट गेट पासून जास्त अंतर ठेवण्यात यावे. |
| ५) | पुणे शहरामध्ये नोंदणीकृत व्यवसायिकांमार्फत रस्ता/पदपथांवर खाद्य पदार्थ शिजवून विक्री केली जाते. याबाबत वांरवार नागरिकांच्या येणाऱ्या तक्रारी व प्रत्यक्ष कायद्यामधील तरतूद तसेच मा. उच्च/सर्वोच्च न्यायालयाने दिलेले आदेश/गाईडलाईन याबाबत चर्चा-विनिमय करुन धोरण निश्चित करणे. | मा. उच्च/सर्वोच्च न्यायालयाने दिलेले आदेशानुसार रस्ता/पदपथांवर खाद्य पदार्थ शिजवू नये. तसेच रस्ता/पदपथांवर खाद्य पदार्थ शिजवून जे व्यवसाय करतात ते अस्वच्छता ही खूप करतात. सध्या अतिक्रमण विभागाकडून सिलेंडर उचलण्याच्या कारवाया करण्यात येतात. | रस्ता/पदपथांवर खाद्य पदार्थ शिजवून जे व्यवसाय करतात त्यांच्याकडे आरोग्याचा परवाना व अन्न व औषध प्रशासनाचा परवाना आवश्यक आहे. मान्य झोन व्यतिरिक्त खाद्य पदार्थ तयार करता येणार नाहीत. खाटीक बाजाराला पथारी व्यवसायिकांसारखेच दैनंदिन परवाना शुल्क लावण्यात यावेत. खाटीक बाजार हा विभाग अतिक्रमण विभागाशी जोडणेबाबत कायदेशीर बाबी तपासून विचार करावा. |
| ६) | आयत्यावेळचे विषय<br>१)पुणे शहरातील सर्व क्षेत्रिय कार्यालयाकडून मा. प्रभाग समितीने दर व जागा निश्चित केल्या असून त्यास शहर फेरीवाला समितीस मान्यता झाली आहे अशा सर्व नविन जागांना ॲपिलेट कमिटीची मंजुरी मिळणेबाबत. | शहरामध्ये नोंदणीकृत फेरीवाल्यांकरीता यापूर्वी समितीकडून २८८ जागा मंजूर केल्या होत्या. त्यापैकी २१४ ठिकाणी पुनर्वसन करण्यात आलेले असून उर्वरीत जागांबाबत कार्यवाही चालू आहे. तसेच शहरातील पूर्वीपासून व्यवसाय चालू असलेली २२१ ठिकाणे निश्चित करण्यात आलेली असून सदर पुनर्वसन ठिकाणास शहर फेरीवाला समितीने मान्यता दिलेली आहे. | शहरातील फेरीवाल्यांचे पुनर्वसनासाठी प्राप्त झालेल्या प्रभाग समिती प्रस्तावानुसार २२१ नव्या जागांसाठी व दरासाठी सर्व सदस्यांनी बहुमताने मान्यता दिली. त्या अनुषंगाने नोंदणीकृत फेरीवाल्यांचे पुनर्वसन व परवाना शुल्काच्या वसुलीबाबत पुढील कार्यवाही करावी. |

Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| | २)राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान (एन.यु.एल.एम) च्या योजनाबाबत. | समाज विकास विभागामार्फत माहिती घेऊन प्रस्ताव तयार करावा. पुढील बैठकीस संबंधित अधिकाऱ्यांना बोलवावे. | याबाबत मा. उप आयुक्त अतिक्रमण यांनी पुढील बैठकीस राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान (एन.यु.एल.एम) बाबत माहिती घेऊन प्रस्ताव तयार करुन संबंधित अधिका-यांना आवश्यक त्या माहितीसह बोलवावे. |
| | ३)शहरामध्ये अतिक्रमण निर्मुलन कारवाई होत नसलेबाबत तसेच अनाधिकृत फेरीवाल्यांची संख्या वाढलेबाबत मुद्दा उपस्थित करण्यात आला. | शहरात बरेचसे व्यवसायिक हे भाडेपट्टयाने इतर व्यवसायिकास देत असलेबाबत ही मुद्दा उपस्थित झाला. | फेरिवाल्याने जर भाटेपट्टयाने परवाना दिला असल्यास त्याचा परवाना रद्द करणेबाबत कारवाई करावी तसेच अनाधिकृत फेरीवाला व्यवसायिकांवर कारवाई करण्यात यावी. |

मा. महापौर तथा समिती अध्यक्ष यांनी बैठकीचे दरम्यान मा. शहर फेरीवाला समितीमधील फेरीवाल्यांचे प्रतिनिधी यांचे मागणीनुसार मा. समिती अध्यक्ष यांनी समिती सदस्यांसमोर त्यांना त्यांचे म्हणणे मांडणेस संधी उपलब्ध करुन देऊन शहरातील फेरीवाल्यांचे पुनर्वसन, शुल्क व थकबाकी आकारणीबाबत सदर प्रतिनिधींचे म्हणणे ऐकून घेतले. शहरातील फेरीवाल्यांचेबाबत वरीलप्रमाणे निर्णय घेऊन बैठक संपन्न झाली.

06.03.18

(माधव जगताप)
उप आयुक्त
अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग
पुणे महानगरपालिका

(शीतल तेली-उगले)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका

(मुक्ता टिळक)
महापौर
पुणे महानगरपालिका

प्रत :-

सर्व संबंधितास...
पुढील योग्य ती कार्यवाहीकरीता व अमंलबजावणीकरीता...

Scanned by CamScanner

अतिक्रमण विभाग, पुणे महानगरपालिका. दिनांक : २८/०२/२०१८

**पथ विक्रेता अधिनियम-२०१४ चे अंतर्गत नोंदणी झालेल्या पथ विक्रेत्यांना व्यवसायानुसार दैनंदिन परवाना शुल्कामध्ये सवलत मिळणाऱ्या व सवलत न मिळणाऱ्या व्यवसायांची यादी.**

| अ. क्र. | परवाना शुल्क सवलतीस पात्र नसलेले व्यवसाय | अ. क्र. | परवाना शुल्क सवलतीमधील करावयाच्या व्यवसायाची यादी | शेरा / शिफारस |
|---|---|---|---|---|
| १ | तयार खाद्य पदार्थ विक्री | १ | भाजीपाला/फळे विक्री | १) शासकीय दूध सरिता केंद्रांना यापूर्वीच सरसकट मान्य दराच्या ५० टक्के सवलतीच्या दराने म्हणजेच रु.१००/- ऐवजी रु.५०/- प्रतिदिन मान्य करण्यात आले आहे. त्यामुळे यांना वेगळी सवलत देण्याची आवश्यकता नाही. |
| २ | इलेक्ट्रीक साहित्य दुरुस्ती/स्पेअरपार्ट विक्री | २ | फळे विक्री | |
| ३ | इलेक्ट्रीक छोटी उपकरणे विक्री दुरुस्ती | ३ | लहान मुलांची खेळणी जागेवर/फेरीणे विक्री | |
| ४ | कपडे ड्राय क्लीनिग व इस्त्री करणे | ४ | घरगुती साहित्य फेरीणे विक्री | |
| ५ | केस कर्तनालय | ५ | घरगुती भांडी फेरीणे विक्री | |
| ६ | चामडी बूट चप्पल विक्री | ६ | तयार खारा माल विक्री | |
| ७ | बेकरी माल विक्री | ७ | कागद रद्दी/भंगार फेरीणे खरेदी विक्री | |
| ८ | झेरॉक्स | ८ | क्रोकरी सामान फेरीणे विक्री | |
| ९ | टायपिंग/संगणकीय कामकाज | ९ | सफाई साहित्य फेरीणे विक्री | २) महाराष्ट्र शासनाच्या पथ विक्रेता अधिनियम-२०१७ या योजनेमधील तरतुदीनुसार नोंदणीकृत दिव्यांग व्यवसायिकांना त्यांचे मान्य व्यवसाय जागेच्या मान्य दैनंदिन परवाना शुल्कामध्ये ५० टक्के सवलत द्यावी लागणार असल्याने अशा पथ विक्रेत्यांना सरसकट सर्व मान्य अधिकृत व्यवसायामध्ये दैनंदिन परवाना शुल्काच्या ५० टक्के सवलत असेल. |
| १० | बुक बायडींग/पुस्तके खरेदी/विक्री | १० | फोटो फ्रेम विक्री | |
| ११ | टेलरिंग काम | ११ | घड्याळ दुरुस्ती | |
| १२ | रेडिमेड कपडे विक्री | १२ | छत्री, कुलूप दुरुस्ती | |
| १३ | होजिअरी/कटलरी माल विक्री | १३ | पुजा साहित्य विक्री | |
| १४ | शालेय साहित्य/स्टेशनरी माल विक्री | १४ | गरम मसाले फेरीणे विक्री | |
| १५ | अंडी/सुकी मासळी विक्री | १५ | अगरबत्ती/सुगंधी साहित्य फेरीणे विक्री | |
| १६ | मासे विक्री | १६ | वाहन नंबर प्लेट तयार करणे | |
| १७ | मटन/चिकन विक्री | १७ | मोड आलेले कडधान्य विक्री | |
| १८ | स्वयंचलित दोन चाकी टायर पंक्चर काढणे | १८ | नाडी-दोरी विक्री करणे | |
| १९ | पानपट्टी विक्री | १९ | सायकलवर अथवा हातांमधील पिशव्यामधून मालाची विक्री करणे | |
| २० | नेमप्लेट/बोर्ड पेन्टिंग काम | २० | सायकल दुरुस्ती तिचे स्पेअरपार्ट विक्री | |
| २१ | थंड पेय/फळांचे ज्यूस विक्री | २१ | सरबते विक्री | ३) परवाना शुल्कामध्ये ज्या पथ विक्रेत्याना त्यांचे सवलतीस पात्र असलेल्या व्यवसायानुसार दैनंदिन परवाना शुल्कामध्ये सवलत द्यावयाची असेल/मान्य होईल, अशा व्यवसायिकांना इतर दुसरे कोणतेही उत्पन्नाचे साधन नसलेबाबतचे लेखी हमीपत्र देणे बंधनकारक करावे अशी प्रशासनाची शिफारस आहे. |
| २२ | उसाचा रस गुऱ्हाळ | २२ | शहाळे (नारळ पाणी) विक्री | |
| २३ | प्लॅस्टिक/काचेच्या घरगुती वस्तु विक्री | | | |
| २४ | दूध दुग्धजन्य पदार्थ विक्री | | | |
| २५ | प्लॅस्टिक चामडी बूट चप्पल विक्री | | | |
| २६ | घरगुती भांडी विक्री | | | |
| २७ | क्रोकरी साहित्य विक्री | | | |
| २८ | सौंदर्यप्रसाधने विक्री | | | |
| २९ | सफाई साहित्य विक्री | | | |

**टीप :-** पुणे शहरातील पथ विक्रेता अधिनियम-२०१४ चे अंतर्गत नोंदणी झालेल्या पथ विक्रेत्यांना व्यवसायानुसार दैनंदिन परवाना शुल्कामध्ये सवलत मिळणाऱ्या व सवलत न मिळणाऱ्या अधिकृत व्यवसायांच्या वरील यादीस महानगरपालिकेच्या मा. मुख्य सभा ठराव क्र. ९६७, दि.२१/०३/२०१६ चे अन्वये उप सुचनेने मान्यता देण्यात आलेल्या मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखालील उप समितीच्या (महानगरपालिकेचे सर्व पदाधिकारी व गटनेते असलेली समिती) दि.२८/०२/२०१८ रोजी झालेल्या बैठकीत मान्यता दिलेली असून त्यामध्ये भविष्यात काही गरजेनुसार बदल करावयाचे असल्यास त्याचे अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना राहतील.

(माधव जगताप)
उप आयुक्त
(अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग)
पुणे महानगरपालिका.

Scanned by CamScanner

**अतिक्रमण विभाग, पुणे महानगरपालिका.** दिनांक : २८/०२/२०१८

**पथ विक्रेता अधिनियम-२०१४ चे अंतर्गत पुणे शहरातील नोंदणी झालेल्या पथ विक्रेत्यांनी करावयाच्या ओटे/गाळे स्टॉल/हातगाडी/बैठा/खोंचा इत्यादीमधून करावयाच्या व्यवसायांची अधिकृत यादी.**

| अ. क्र. | फेरीने/फिरत्या हातगाडीमधून करावयाच्या व्यवसायाची यादी | स्थिर हातगाडी/बैठा यामधून ककरावयाच्या व्यवसाय यादी | पक्क्या स्वरूपातील स्टॉल/ गाळे/ओटे/ मार्केट इत्यादीमधून करावयाचे व्यवसाय यादी |
|---|---|---|---|
| १ | भाजीपाला विक्री | सिझनल भाजीपाला विक्री | शासकीय दूध सरिता केंद्र |
| २ | फळे विक्री | सिझनल फळे विक्री | इलेक्ट्रीक साहित्य दुरुस्ती/स्पेअरपार्ट विक्री |
| ३ | होजिअरी/कटलरी माल विक्री | होजिअरी/कटलरी माल विक्री | इलेक्ट्रीक छोटी उपकरणे विक्री दुरुस्ती |
| ४ | स्टेशनरी माल विक्री | स्टेशनरी माल विक्री | कपडे ड्राय क्लीनिग व इस्त्री करणे |
| ५ | लहान मुलांची खेळणी विक्री | लहान मुलांची खेळणी विक्री | केस कर्तनालय |
| ६ | घरगुती साहित्य विक्री | घरगुती साहित्य विक्री | चामडी बूट चप्पल विक्री |
| ७ | भांडी विक्री | भांडी विक्री | बेकरी माल विक्री |
| ८ | फळांचे ज्युस/सरबते विक्री | फळांचे ज्युस/सरबते विक्री | झेरॉक्स |
| ९ | आइस्क्रीम/दही/लस्सी विक्री | आइस्क्रीम/दही/लस्सी विक्री | टायपिंग/संगणकीय कामकाज |
| १० | बुक बायडींग/जुनी पुस्तके खरेदी विक्री | जुनी पुस्तके खरेदी विक्री | बुक बायडींग/जुनी पुस्तके खरेदी विक्री |
| ११ | बेकरी माल विक्री | बेकरी माल विक्री | टेलरिंग काम |
| १२ | पॅकींग तयार खाद्यपदार्थ विक्री | तयार खाद्यपदार्थ विक्री | रेडिमेड कपडे विक्री |
| १३ | तयार खारा माल विक्री | तयार खारा माल विक्री | अगरबत्ती/सुगंधी साहित्य विक्री |
| १४ | प्लॅस्टिक/काचेच्या घरगुती वस्तु विक्री | प्लॅस्टिक/काचेच्या घरगुती वस्तु विक्री | शालेय साहित्य व पुस्तके विक्री |
| १५ | कागद रद्दी खरेदी व्यवसाय | कागद रद्दी खरेदी व्यवसाय | अंडी/मटन/चिकन/ विक्री |
| १६ | क्रोकरी सामान विक्री | क्रोकरी सामान विक्री | सायकल दुरुस्ती/स्पेअरपार्ट विक्री |
| १७ | सौंदर्य प्रसादने विक्री | सौंदर्य प्रसादने विक्री | पानपट्टी विक्री |
| १८ | सफाई साहित्य विक्री | सफाई साहित्य विक्री | तयार खाद्य पदार्थ विक्री |
| १९ | सिझनल सणांचे साहित्य विक्री | सिझनल सणांचे साहित्य विक्री | नेमप्लेट/बोर्ड पेन्टिंग काम |
| २० | रद्दी/लोखंडी भंगार खरेदी व्यवसाय | दूध व दूधाचे पदार्थ विक्री | दूध दुग्धजन्य पदार्थ विक्री |
| २१ | प्लॅस्टिक बूट/चप्पल विक्री | फोटो फ्रेम विक्री | थंड पेय/फळांचे जूस विक्री |
| २२ | अगरबत्ती/सुगंधी साहित्य विक्री | घड्याळ दुरुस्ती | उसाचा रस गुऱ्हाळ |
| २३ | मोड आलेले कडधान्य विक्री | छत्री, कुलूप दुरुस्ती | शहाळे (नारळ पाणी) विक्री |
| २४ | शहाळे (नारळ पाणी) विक्री | पुजा साहित्य विक्री | सायकल दुरुस्ती तिचे स्पेअरपार्ट विक्री |
| २५ | सरबते विक्री | गरम मसाले विक्री | |
| २६ | | चप्पल दुरुस्ती (गटई काम) | |
| २७ | | प्लॅस्टिक चामडी बूट चप्पल विक्री | |
| २८ | | अगरबत्ती/सुगंधी साहित्य विक्री | |
| २९ | | वाहन नंबर प्लेट तयार करणे | |
| ३० | | मोड आलेले कडधान्य विक्री | |
| ३१ | | नाडी-दोरी-गंडा विक्री करणे | |
| ३२ | | सायकलवर अथवा हातांमधील पिशव्यामधून मालाची विक्री करणे | |
| ३३ | | शहाळे (नारळ पाणी) विक्री | |
| ३४ | | सरबते विक्री | |

**<u>टीप</u> :- पुणे शहरातील नोंदणी झालेल्या पथ विक्रेत्यांनी करावयाच्या ओटे/गाळे स्टॉल/हातगाडी/बैठा/खोंचा इत्यादीमधून करावयाच्या अधिकृत व्यवसायांच्या वरील यादीस महानगरपालिकेच्या मा. मुख्य सभा ठ. क्र. ९६७, दि.२१/०३/२०१६ चे अन्वये उप सुचनेने मान्यता देण्यात आलेल्या मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखालील उप समितीच्या (महानगरपालिकेचे सर्व पदाधिकारी व गटनेते असलेली समिती)दि.२८/०२/२०१८ रोजी झालेल्या बैठकीत मान्यता दिलेली असून त्यामध्ये भविष्यात काही गरजेनुसार बदल करावयाचे असल्यास त्याचे अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना राहतील.**

(माधव जगताप)
उप आयुक्त
(अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग)
पुणे महानगरपालिका.

Scanned by CamScanner